**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर**

ग्राहक तक्रार क्र. १७–०९/ दिनांक :

श्री. कृष्णा रामजी शिंदे,
रा. जाडरबोबलाद, ता. जत, जि. सांगली अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली

**कोरम :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. एस.आर.बांबळे, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : ११.०५.२००९

श्री. कृष्णा रामजी शिंदे, रा. जाडरबोबलाद, ता. जत, जि. सांगली (प्रकरण क्र. १७/२००९) यांनी ३ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी या करीता वितरण कंपनीकडे अर्ज केला आहे व अनामत रक्कम भरली आहे. अद्याप वीज जोडणी मिळाली नाही अशी ग्राहकाची तक्रार आहे.

तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांजकडे प्रकरण क्र. ८९४ दि. २.१२.२००८ रोजी क्ष नमुना अर्जात तक्रार दाखल केली होती. अंतर्गत कक्षात सुनावणी झाली परंतु निकाल पत्र अद्याप झाले नाही. त्यामुळे त्यांनी ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे दि. २५.२.२००९ रोजी अपील दाखल केले आहे. त्यावर मंचाने संबंधिताकडून मुद्देनिहाय अहवाल मागविला व सुनावणी दि. ५.५.२००९ रोजी सांगली येथे ठेवली व पार पडली. सुनावणीवेळी तक्रारदार किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते. तर वितरण कंपनीतर्फे श्री. बी.बी. भोसले, कार्यकारी अभियंता, श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता दोघे कवठे महांकाळ विभाग व श्री. दिवटे, सहाय्यक अभियंता, संख उप विभाग इ. हजर होते.

तक्रारदाराची तक्रार

जाडरबोबलाद, ता. जत, जि. सांगली येथे शेतीपंपास वीज जोडणी मिळणे करीता वितरण कंपनीकडे मागणी अर्ज दि. २.१२.२००८ रोजी केला आहे. अद्याप चलन व कनेक्शन मिळाले नाही. कनेक्शन मिळणेस दाद मागत आहोत. तरी एस.ओ.पी. नुसार वीज जोडणी मिळावी किंवा नुकसान भरपाई मिळावी.

वितरण कंपनीचे म्हणणे

तक्रारदार यांनी जाडरबोबलाद, ता. जत, जि. सांगली येथे शेतीपंपास वीज जोडणी मिळणे करीता वितरण कंपनीकडे दि. २.१२.२००८ रोजी अर्ज केला आहे. त्यानुसार कोटेशन दि. २०.२.२००९ रोजी देणेत आले आहे व कोटेशन रक्कम दि. ९.३.२००९ रोजी भरले आहे. तक्रारदाराने अद्यापपावेतो वीज संच माडणीचा चाचणी अहवाल सादर केला नाही तो सादर केलेवर मुदतीत कनेक्शन देणेत येईल.

सदस्य सचिव यांचा निष्कर्ष

तक्रारदार यांनी वि.प.कडे शेतीपंप वीज जोडणी मिळणे करीता मागणी केली आहे व कोटेशन रक्कमही भरली आहे. पुढील पूर्तता करतांना तक्रारदार यांनी वीज संच मांडणीचा चाचणी अहवाल देणे प्रलंबित आहे असे वि.प.ने नमूद केलेवरुन दिसते. तक्रारदार यांची मागणी वीज कनेक्शन मिळावे किंवा नुकसान भरपाई मिळावी अशी असून वि.प. वीज कनेक्शन देणेस तयार आहे. त्यामुळे नुकसान भरपाई मागणीचा विचार करता येणार नाही.

दोन्ही बाजूंचे म्हणणे, उपलब्ध कागदपत्रें, युक्तीवाद विचारांत घेऊन सदस्य सचिव, ग्राहक तक्रार निवारण मंच यांजकडून खालील प्रमाणे आदेश देणेत येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१) तक्रारदाराचे अपील फेटाळणेत येत आहे.

२) भरपाईचा आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ११.०५.२००९

( एस. आर. बांबळे )
सदस्य सचिव

श्री. काकासाहेब य. जगताप, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :